झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

परिपत्रक क्रमांक 89

जा.क.झोपुप्रा / मुकाअ / परिपत्रक / 2004/1039
5 वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई–400 051.
दिनांक 23.12.2004

**विषय: महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम–2002**

महाराष्ट माहिती अधिकार अध्यादेश 2002 अंतर्गत नियम 6 (1) नुसार प्राप्त झालेल्या अर्जावर कलम 6 पोटकलम 2 नुसार तो अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा कामाच्या दिवसांपेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीत अर्जावर कार्यवाही करुन अर्जदारास माहिती पुरविणे आवश्यक आहे.

असे निदर्शनास आले आहे की, संबंधित विभागांकडे अर्ज कार्यवाहीसाठी पाठविल्यावर संबधित विभागप्रमुखांकडून विहित वेळेत योग्य ती कार्यवाही करण्यात येत नाही व त्यामुळे अर्जदारास माहिती कळविण्यास उशिर होतो. तसेच प्राधिकरणाकडून "महाराष्ट माहिती अधिकार अधिनियम–2002" अंतर्गत विहित वेळेत माहिती मिळत नसल्याच्या अनेक अर्जदारांकडून तकारी येत आहेत. व त्यासाठी माहिती अधिका–यांना जवाबदार ठरविले जात आहे.

त्याचबरोबर असेही निदर्शनास आले आहे की, ब–याच वेळेस सदोष व अपूर्ण माहिती संबधित विभागास पुरविली जाते.

तरी सर्व संबधित विभागप्रमुखांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम–2002 अन्वये प्राप्त होणा–या अर्जावर त्वरीत कार्यवाही अंतर्गत मागविलेली पूर्ण माहितीची पूर्तता करुन शक्यतो चार दिवसांच्या आत संबधित विभागास माहिती व अभिप्राय

कळवावेत जेणेकरुन अर्जदारास विहीत वेळेत (15 कामाच्या दिवसांमध्ये) माहिती देणे शक्य होईल.

वरील आदेशांच्या पालनामध्ये दिरंगाई आढळयास संबधित अधिका–यांवर कलम 22 (1) नुसार माहिती देण्यास विलंब केल्याच्या प्रत्येक दिवसाकरिता रुपये 250/– एवढया रकमेची शास्ती लादली जाईल. सदर शास्तीची रक्कम कलम 12 पोटकलम 4 नुसार संबधित अधिका–याच्या वेतनातून वसुली योग्य असेल.

[signature]

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**

प्रती,

1. मा. मु. का. अ. यांचे स्विय सहाय्यक/झोपुप्रा.
2. मा. सचिव यांचे स्विय सहाय्यक/झोपुप्रा
3. मा. वित्त नियंत्रक यांचे स्विय सहाय्यक
4. उपजिल्हाधिकारी/झोपुप्रा.
5. उपसंचालक, नगर रचना/झोपुप्रा
6. विधी सल्लागार/झोपुप्रा
7. मुख्य कार्यकारी अभियंता/झोपुप्रा कार्यकारी अभियंता [illegible]
8. सहा. निबंधक/झोपुप्रा
9. समाज विकास अधिकारी व जनसंपर्क अधिकारी/झोपुप्रा
10. प्रशासकीय अधिकारी/झोपुप्रा.
11. माहिती तंत्रज्ञान अधिकारी/झोपुप्रा